# बृहन्मुंबई महानगरपालिका

## क्र. एचओ /१०६८/ मुदेमनेरु दि.३०.०८.२०२४

विषय:- मुरली देवरा महानगरपालिका नेत्र रुग्णालयाकरिता साफसफाईच्या कामाकरिता कंत्राटी तत्वावर बहुउद्देशीय कामगार पुरविण्याबाबत.

महानगरपालिका नेत्र रुग्णालयाकरिता साफसफाईच्या कामाकरिता कंत्राटी तत्वावर बहुउद्देशीय कामगार पुरविण्याबाबत संस्थेची नेमणुक करण्याकरिता इच्छुक संस्था यांच्यामार्फत मोहोरबंद दरपत्रक/ईच्छापत्र मागविण्यात येत आहेत.

दरपत्रिका भरण्यापूर्वी खालील ठळक बाबी लक्षात घ्याव्यात-

| | | |
|---|---|---|
| १ | विभागवार कार्यक्षेत्र व कामगारांची संख्या | विभागवार कार्यक्षेत्र व कामगारांची संख्या परिशिष्ठ 'अ' प्रमाणे, विभाग कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार कामगार संख्या कमी अथवा जास्त होउ शकते. |
| २ | कामाचा कालावधी | कार्यादेश देण्यात येणाऱ्या दिनांका पासून १८० दिवस |
| ३ | कामाचे स्वरुप व तपशील | अ) साफ सफाई करण्याच्या कामाचे स्वरुप |
| ४ | प्रत्येक कामगारांसाठी आवश्यक साहित्य | अ) साफ सफाई - १) आवश्यकतेप्रमाणे घमेली,इझी इन्स झाडु, फावडा व काटा.<br>२) प्रत्येक सदस्यास एक याप्रमाणे:- हातमोजे, परावर्तीत जॅकेट, रेनसुट, गमबुट, फेसमास्क इ. सुरक्षा साहित्य वेळच्या वेळी पुरविणे संस्थेवर बंधनकारक राहील.<br>३) भौगोलिक परिस्थतीनुसार आवश्यक असलेले इतर साहित्य.<br>४) प्रत्येक सदस्यास संस्थेचे अधिकृत ओळखपत्र लावणे बंधनकारक राहील. |
| ५ | या कामासाठी कोण अर्ज भरु शकतात. | १) नोंदणीकृत असणा-या इच्छुक संस्था उदा:-नोंदणीकृत कामगार सहकारी संस्था/नोंदणीकृत सहकारी सेवा संस्था/अशासकीय संस्था/नोंदणीकृत बेरोजगार संस्था (या सर्व संस्थांच्या स्थापनेचा मुख्य उद्देश त्याच्या सभासद कामगारांना रोजगार देणे हा असावा.) असणे आवश्यक आहे. संस्थेंच्या सभासदांची यादी संचालकाच्या स्वाक्षरीने बदली झाल्यास त्याची लेखी माहिती संबंधित कार्यालयास दिल्याशिवाय बदल करण्यात येणार नाही.<br>२) अर्जासोबत अत्यावश्यक कागदपत्रे असणे बंधनकारक आहे.<br>३) सन २०२३-२४ सालाचा ताळेबंद अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.<br>४) संस्थाकडे कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन) १९७० अन्वये परवाना बंधनकारक राहील.<br>५) कामगार भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९४२ अंतर्गत नोंदणी परवाना बंधनकारक राहील (सर्व स्वयंसेवकांची यादी सोबत जोडणे आवश्यक आहे.<br>६) कामगार राज्य विमा योजना १९४८ अंतर्गत नोंदणी बंधनकारक आहे. (सर्व स्वयंसेवकांची यादी सोबत जोडणे आवश्यक आहे.)<br>७) महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाचे सर्व कामगार कायदे पाळणे बंधनकारक आहे.<br>८) मनपा रुग्णालयामध्ये साफसफाईच्या कामाचा अनुभव असणे बंधनकारक आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | ९) संस्थेच्या सर्व पदाधिका-यांचे मोबाईल नं. असणे बंधनकारक आहे.<br>१०) अर्जाच्या सर्व पानावर संस्थेचे मोहर व एका पदाधिका-याची स्वाक्षरी असणे बंधनकारक आहे.<br>११) जीएसटी ॲक्ट अंतर्गत नोंदणी असणे बंधनकारक आहे.<br>१२) इच्छापत्र सुचीतील इतर अटीशिवाय कामाच्या ठिकाणी पुर्ववेळ कामासाठी देखरेख व कार्यवाही या कारणास्तव पर्यवेक्षक उपस्थित ठेवावा लागेल. कामाच्या जागेवर त्यांच्या व्यतिरिक्त दुसरा प्रतिनिधी चालणार नाही.<br>१३) ज्या संस्था काळ्या यादीत आहेत किंवा ज्या संस्थांचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेने समाधनकारक नाही म्हणुन काढून टाकले आहे. त्या संस्थांनी या कामासाठी दरपत्रिका करु नये,कारण अशा संस्थांना अपात्र ठरवण्यात येईल. संस्था एका विभाग कार्यालयात एकच अर्ज सादर करु शकते. अर्ज करणा-या संस्थेचे पदाधिकारी अन्य संस्थेच्या कार्यकारणी पदावर आढळल्यास एकच संस्था पात्र होऊ शकते. |
| ६ | अर्ज कोठे, कसे व कधी मिळतील | इच्छुक संस्था या योजनेची सर्व माहिती, प्रमुख वैद्यकीय अधिकारी कार्यालय मुरली देवरा मनपा नेत्र रुग्णालय कार्यालय यांच्याकडुन दि.१३.०९.२०२४ ते दि.२४.०९.२०२४ या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ०४.०० वाजेपर्यंत कोणत्याही कामाच्या दिवशी ( शनिवार व सुट्टीचे दिवस सोडुन इतर कामाच्या दिवशी) लेखी अर्ज व छाननी शुल्क रु.३३००/-+ १८% जीएसटी या किमतीची (एकुण रु.५९४/- रोख स्वरुपात चलन काढून किंवा राष्ट्रीयकृत बॅंकेचा डी.डी. बृहन्मुंबई महानगपालिका आयुक्त या नावाने नागरीक सुविधा केंद्रात भरणा करावा. |
| ७ | अर्ज कसे भरावेत ? | इच्छापत्र मोहरबंद लिफाफा मनपा नेत्र रुग्णालयाकरिता साफसफाईच्या कामाकरिता कंत्राटी तत्वावर बहुउद्देशीय कामगार पुरविण्याबाबत असे नमुद करावे व संस्थेचे नाव लिहावे.<br>मोहरबंद लिफाफ्यामध्ये इच्छापत्र दि.२५.०९.२०२४ च्या पुर्वी किंवा त्याचदिवशी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत मुरली देवरा मनपा नेत्र रुग्णालय यांच्या आवक जावक विभागात सादर करावेत. सुचीत केलेल्या वेळे नंतर प्राप्त झालेले अर्ज (मोहरबंद लिफाफा) न उघडता फेटाळण्यात येतील. |
| ८ | अर्ज बाद होऊ नये म्हणून निश्चितपणे पूर्तता करण्याच्या बाबी<br>(Mandatory condition) | खालील बाबींची पूर्तता केलेली नसल्यास दरपत्रिका अपुरे अनियमित व अवैध ठरवून नाकारले जातील:<br>१)संस्थेचे अध्यक्ष व सचिव, अथवा ज्यांना संस्थेने संस्थेशी संबंधित कागदपत्रावर स्वाक्षरी करण्यासाठी प्राधिकृत केले असेल त्यांनी अर्जदार तसेच हमीपत्राच्या प्रत्येक पानावर संस्थेची मोहोर व स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.<br>२)अर्हता अर्जामध्ये नमुद केलेली (मागितलेली) सर्व माहिती देणे आवश्यक आहे. कंत्राटी कामगार नियम व निर्मुलन कायदा १९७० अन्वये परवाना आहे व किंवा कसे तसेच कामगार राज्य विमा योजना १९४८ व कामगार भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९४२अंतर्गत नोंदणी बाबतचा तपशील घ्यावा याबाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.<br>३)अर्जासोबत मागितलेले आयकर कायम खाते क्रमांक, वास्तव्याचा पुरावा, लेखापरिक्षित ताळेबंद (मागील १ वर्ष) आणि इतर आवश्यक कागदपत्र यांची प्रमाणित |

| | | |
|---|---|---|
| | | केलेली छायांकीत प्रती सादर करणे.<br>४) कागदपत्रांसोबत संस्थेच्या किमान तीन पदाधिका-यांचे ज्यात अध्यक्ष, सचिव व अन्य पदाधिकारी यांचे स्वत:च्या स्वाक्षरीसहीत फोटो देणे आवश्यक आहे.<br>५) संस्थेचे सादर करावयाचे हमीपत्र (रू.१०० च्या स्टॅम्प पेपरवर) सोबत दिलेल्या परिशिष्ट - 'ड' नमुन्यात सादर करावे. |
| ९ | काम - वाटप पध्दतीचा तपशिल | कामाचे वाटप करण्याची पध्दती महानगरपालिका आयुक्तांनी अर्जदारास काम दयावयाचे याबाबत सर्व अधिकार राखून ठेवले आहेत. तसेच अर्जदार कोणतेही काम नाकारु शकत नाही.<br>दिलेल्या पात्रतेच्या अटी व शर्तीनुसार अर्जाची छाननी केली जाईल. सर्व पात्र कार्यकारी संस्थांमधून सोडत पध्दतीने संस्थांची नेमणूक करण्यात येईल. अशा प्रकारे महानगरपालिका विभागातील मुरली देवरा नेत्र रुग्णालय येथील साफ सफाईच्या कामाकरिता १२ बहुउद्देशिय कामगार पुरविण्याबाबत सर्व पात्र संस्थांची विभाग कार्यालयामध्ये सुची जाहिर केली जाईल. संस्थाची नेमणूक प्रमुख वैद्यकीय अधिकारी मनपा यांच्या मंजुरीने केली जाईल.<br>जर एखादया संस्थेने त्यांना दिलेले काम करण्यास नकार दिल्यास / असमर्थ ठरली तर उर्वरित पात्र सूचीतील संस्थांमधून सोडत काढण्यात येईल व पात्र संस्थेला सदर काम देण्यात येईल. अर्जदार नेमुन दिलेल्या कामाची आपापसात अदलाबदल करु शकणार नाही. |
| १० | संस्थांनी करावयाची कार्यवाही | अ) संस्थेस प्रत्येक महिन्याच्या २१ तारखेपर्यंत आवश्यक ती कागदपत्रे देयकासमवेत संबंधित विभाग कार्यालयातील मनपा नेत्र रुग्णालय यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. देयकासोबत सदस्यांची हजेरीपत्रके, मंजुरी आदेश, इत्यादी सादर करणे आवश्यक आहे.तसेच संबिधत ठिकाणी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या उपस्थितीपटानुसार संबधत कर्मचाऱ्याच्या बॅक खात्यामध्ये जमा करण्यात आलेल्या वेतनाबाबतचा तपशिल सोबत देणे बंधनकारक राहिल.<br>ब) संस्थांनी त्यांच्या सर्व कामगारांना काम सुरू करताना ओळखपत्र, हजेरी कार्ड देणे बंधनकारक राहिल.<br>क) प्रत्येक संस्थेने त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या कामगारांना महिन्याच्या १० तारखेच्या आत दरमहा वेतनाचे अधिदान करणे बंधनकारक राहिल. (महापालिकेकडून अधिदान झाले नसेल तरीही सभासदांना विहित वेळेत अधिदान करणे बंधनकारक आहे.परिशिष्ठ ''ब'' प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल. ) |
| ११ | प्रमुख वैद्यकीय अधिकारी म.न.पा निविदेबाबतचे अधिकार | म.न.पा आयुक्तांना निविदेतील कोणतीही अट शिथिल करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अथवा कोणतेही कारण न देता इच्छापत्रासाठी केलेली मागणी रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत. |
| १२ | कामाचे पुनर्वाटप | संस्थेला मिळालेले काम दुसऱ्या संस्थेला कामाचे पुनर्वाटप करून देता येणार नाही. हे काम त्याच संस्थेने करणे बंधनकारक राहिल. जर एखादी संस्था दिलेले काम करण्यास असमर्थ ठरली तर दुसऱ्या संस्थेची नेमणूक पात्र सुचीतील संस्थामधून प्रमुख वैद्यकीय अधिकारी मनपा यांच्या मंजुरीने सोडत पध्दतीने करण्यात येईल व दंड |

| | | |
|---|---|---|
| | | म्हणून अशा असमर्थ संस्थेची अनामत रक्कम जप्त केली जाईल व संस्थेचे नाव काळया यादीत टाकण्यात येईल. |
| १३ | अनामत रक्कम | १.यशस्वी ठरलेल्या संस्थाना एकुण **कार्यादेश रक्कमेच्या अनामत** रक्कम भरणे आवश्यक आहे.<br>२.महानगरपालिकेत सध्या कार्यरत असलेल्या कामासाठी अनामत रक्कम भरली असेल तरी ती अनामत रक्कम हया कामासाठी ग्राहय धरली जाणार नाही. ( सदर कामासाठी सर्व अधिकार महानगरपालिकेकडे राखुन आहेत) |
| १४ | आवाहन | हे काम मुरली देवरा मनपा नेत्र रुग्णालयाकरिता साफसफाईच्या कामाकरिता कंत्राती तत्वावर बहुउद्देशीय कामगार पुरवण्या अंतर्गत असल्याने सर्व ईच्छापत्रकारांनी कामाचे महत्व जाणून घेऊन अटी / शर्ती नुसार काम करण्यासाठी कटिबध्द राहावे. ईच्छापत्र भरताना वरील सर्व बाबी तपासून अंतिम ईच्छापत्र सादर करावे, हि विनंती. |
| १५ | दंड | परिशिष्ट ''ब'' प्रमाणे |

**★ शासनाच्या परिपत्रकानुसार नोंदणीकृत सेवाभावी संस्थांना सदर अनामत रक्कम भरण्याकरिता सूट देण्यात येईल. त्याकरिता त्यांनी परिपत्रकात नमूद आवश्यक कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे.**

सही/-दि.३०.०८.२०२४
प्रमुख वैद्यकीय अधिकारी
मुरली देवरा महानगरपालिका नेत्र रुग्णालय

# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

**परिशिष्ठ- 'ब'**

दंड आकारणी संस्थाच्या कामकाजाबाबत चुक निदर्शनास आल्यास अथवा अटी व शर्तीचा भंग केल्यास आकारण्यात येणा-या दंडात्मक वसुली रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | दोष / त्रुटी | दंड (रुपयामध्ये) |
|---|---|---|
| १ | अनुपस्थिती | |
| | अ) सभासद कमी पुरविल्यास किंवा कामाच्या ठिकाणी हजर नसल्यास | प्रत्येकी रु ५००/- प्रतिदिन |
| | ब) पर्यवेक्षक कमी पुरविल्यास | |
| २ | 1) साफसफाई न केलेली आढळल्यास | कोणत्याही भंगासाठी एकावेळी रु ५००/- प्रतिदिन |
| | ब) जाळलेला कचरा आढळल्यास ( पाहणीनुसार) | |
| | क) कचरा पेटीच्या बाहेर कचरा आढळल्यास ( पाहणीनुसार) | |
| | ड) नाल्सामध्ये कचरा टाकतांना आढळल्यास ( पाहणीनुसार) | |
| | इ) कचरा संकलन केंद्रासभोवताली जंतूनाशक पावडर न वापरल्यास ( पाहणीनुसार) | |
| ३ | अ) विहित कालावधीत संस्थेने वेतनाचे अधिदान न केल्यास. | रु ५०००/- (प्रथमवेळी ) रु १००००/- (दुस-यावेळी ) |
| | ब) वेतनाचे अधिदान NEFT/RTGS व्दारे न केल्यास संस्थेचे काम रद्द करुन काळया यादीत नाव टाकण्यात येईल. | |
| ४ | अ साधनसामुग्रीची कमतरता. | जी साधनसामुग्री वापरली नसेल त्याचे किमतीचे ( महापालिका दराने ) दुप्पट रक्कम वसूल करुन संबंधित वस्तू महापालिकेकडून पुरविण्यात येईल. |
| | ब सुरक्षिततेची साधने न वापरल्यास. | |

अधिकतम मासिक दंडाची रक्कम ही मासीक अधिदानाच्या २०% राहील. व त्यापेक्षा अधिक दंड न आकारता, "कारणे दाखवा नोटीस" बजावून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**परिशिष्ठ – 'क'**

| | |
|---|---|
| अ) | प्रति कामगार दैनिक मानधन<br>★१)कामगार दैनिक मानधन (रू.७६४.०३) + ४९.५८% लेव्ही ) |
| ब)प्र | प्रचलित नियमानुसार आयकर व इतर खर्च / दंड मासिक वजावट करण्यात येईल. |

★ सध्या अनुज्ञेय असलेले केंद्रीय किमान वेतन, वेळोवेळी बदल होण्यासापेक्ष.

सही/-दि.३०.०८.२०२४
प्रमुख वैद्यकीय अधिकारी
मुरली देवरा महानगरपालिका नेत्र रुग्णालय

<u>१०० रू. स्टॅम्प पेपर</u>

# हमीपत्र

**<u>परिशिष्ट – ड</u>**

मी श्री./श्रीम. ………………………………………………………… या संस्थेचा पदाधिकारी म्हणून ………………………………………… या पदावर दिनांक ………………. पासून कार्यरत असून संस्थेच्या नियमांप्रमाणे माझी सदर पदावर दि. …………………. पासून रितसर नियुक्ती झाली आहे. संस्थेच्या नियमानुसार/ ठरावानुसार मला संस्थेच्या वतीने सदर हमीपत्र देण्याचा अधिकार असून त्यानुसार मी खालीलप्रमाणे हमीपत्र देत आहे.

1. मुंबई महानगरपालिकेच्या "मनपा नेत्र रुग्णालयाकरिता साफसफाईच्या कामाकरिता कंत्राटी तत्वावर बहुउद्देशीय कामगार साफसफाई करुन घेण्याकरिता एनजीओ सभासदांचा पुरवठा करण्याचे" काम आमच्या संस्थेला मिळण्यासाठी आम्हीअर्ज(इच्छापत्र) सादर केला असून अर्जात नमूद सर्व तपशील माझे माहितीनुसार योग्य व खरा आहे.

2. मी शपथपूर्व जाहिर करतो की आमच्या संस्थेचा उद्देश हा संस्थेच्या सभासदांना रोजगार मिळविणे हा असून माझ्या संस्थेस कार्यादेश मिळाल्यास आम्ही योजनेच्या नियमानुसार काम करण्याची हमी याद्वारे देतो.

3. आम्हाला मिळालेला कार्यादेश संपुर्ण अथवा विभागून अन्य संस्था किंवा कंत्राटदारास देणार नाही.

4. सदर कामात राज्य / केंद्र शासनाने पारीत केलेल्या सर्व सभासद कायद्यांचे आम्ही संपुर्ण पालन करू.

5. अर्जात नमूद केलेल्या सर्व बाबी मी वाचल्या आहेत व त्या मला समजल्या आहेत. परिशिष्टातील अटी मला मान्य आहे. मी असे जाहिर करतो/ करते की अर्जात दिलेली माहिती माझ्या विश्वासानुसार सत्य व योग्य असून ती असत्य असल्याचे दिसून आल्यास मी कायदेशीर कारवाईला पात्र असेन तसेच संस्थेला मिळालेले काम / कार्यादेश त्यामुळे रद्द होऊ शकतो हे मला मान्य आहे.

स्वाक्षरी:-

नाव:-

पदनाम:-

पत्ता:-

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## इच्छापत्र

1. अर्जदार संस्थेचा प्रकार:- योग्य त्या पर्यायावर करावे.

अ) मजूर सहकारी संस्था.

ब) सेवा सहकारी संस्था.

क) बेरोजगारी संस्था.

ड) अशासकीय संस्था.

2. संस्थेच्या स्थापनेचा उद्देश सभासदांना रोजगार मिळणे असा आहे काय होय/नाही.

3. असल्यास संस्थेची घटना व उपविधी यांची नोंदणीसाठी सादर केलेली प्रत जोडावी .

4. संस्थेच्या प्रत्येक सभासदाकडून संस्थेने किती भाग भांडवल जमा केले आहे.

5. संस्थेकडे उपलब्ध एकूण भाग भांडवल व अन्य निधी किती आहे (बँक खात्याच्या पासबूकची प्रत जोडावी.)

6. संस्थेची पत्र व्यवहार संपूर्ण पत्ता

कार्यालय:-

दुरध्वनी:-

भ्रमणदुरध्वनी:-

फॅक्स/ ई-मेल:-

7. संस्थेच्या विद्यमान पदाधिका-यांची माहिती

अ) अध्यक्ष:- नाव

पत्ता

दुरध्वनी

फोटो

ब) सचिव:- नाव

पत्ता

दुरध्वनी

फोटो

क) अन्य सभासद:- नाव

पत्ता

दुरध्वनी

फोटो

8. संस्थेचे सन २०२३-२४ चे लेखा परिक्षण केलेल्या वार्षिक लेखाची प्रत जोडावी.

9. अ) महापालिकेत सध्या संस्था कार्यरत आहे काय होय/नाही.

ब) असल्यास सध्याच्या कामाचे स्वरूप थोडक्यात द्यावे.

10. अ) महापालिकेत पूर्व संस्था कार्यरत होती काय होय/नाही.

11. ब) असल्यास कामाचे स्वरूप द्यावे. होय/नाही.

क) काळ्या यादीत टाकले काय

12. विहीत नमून्यातील संस्थेने द्यावयाचे हमीपत्र सोबत जोडले

13. अ) संस्था कंत्राटी कामगार अधिनियम 1970 अन्वये नोंदणीकृत आहे काय होय/नाही.

ब) नसल्यास कायद्यप्रमाणे सूट आहे काय

क) असल्यास नोंदणीपत्राची प्रत जोडावी

14. अ) संस्था भविष्य निर्वाह अधिनियमान्वये नोंदणीकृत आहे काय होय/नाही.

ब) नसल्यास कोणत्या तरतूदीन्वये सूट मिळाली आहे. कागदोपत्री पुरावा जोडला

क) असल्यास नोंदणी पत्राची प्रत जोडावी.

15. अ) संस्था महाराष्ट्र कामगार राज्य विमा योजना अधिनियमानुसार नोंदणीकृत आहे काय होय/नाही

ब) नसल्यास कोणत्या नियमानुसार सूट मिळाली आहे. कागदोपत्री पुरावा जोडला

क) असल्यास नोंदणीपत्राची प्रत जोडावी.

अर्जदाराची स्वाक्षरी

पूर्ण नाव:-

पदनाम:-

पत्ता:-

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

दि....../......../२०२

प्रति,

**प्रमुख वैद्यकीय अधिकारी**

**मुरली देवरा मनपा नेत्र रुग्णालय**

इच्छापत्र

(अर्जाचा नमूना)

विषय:- मनपा मुरली देवरा नेत्र रुग्णालयाकरिता साफसफाईच्या कामाकरिता कंत्राटी तत्वावर बहुउद्देशीय कामगार पुरविण्याबाबत.

संदर्भ:- जाहिरात क्र........................ दि....../......./२०२

अर्जाचा तपशील:-

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव | मेसर्स...................................................... |
| २ | संस्था महानगरपालिका नोंदणी क्रमांक | ........................................................... |
| ३ | बीएमसी वेंडर क्रमांक | ........................................................... |
| ४ | पत्रव्यवहारासाठी संस्थेचा संपूर्ण पत्ता | कार्यालय:-.................................................<br>........................................................... पिनकोड क्र................................................<br>दुरध्वनी :-.................................................<br>भ्रमरध्वनी:-................................................<br>फॅक्स:-.....................................................<br>ईमेल आयडी:-............................................. |
| ५ | संस्थेचा पॅन क्रमांक | ........................................................... |
| ६ | संस्थेचा जीएसटी क्रमांक | ........................................................... |
| ७ | कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन ) १९७० अन्वये परवाना क्रमांक | ........................................................... |
| ८ | कामगार भविष्यनिर्वाह निधी अधिनियम १९४२ अतंर्गत नोंदणी परवाना क्रमांक. | ........................................................... |
| ९ | कामगार राज्य विमा | ........................................................... |

| | | |
|---|---|---|
| | योजना १९४८ अतंर्गत नोंदणी परवाना क्रमांक. | |
| १० | रुग्णालयीन कामाचा/ड्रेसिंग अनुभव असल्यास, | होय /नाही.<br>रुग्णालयाचे नाव ..........................................<br>.........................................................................................................<br>..... |
| ११ | संस्थेस महानगरपालिकेने काळ्या यादीत टाकले आहे का? | होय /नाही. |

मी खालील कागदपत्रांच्या स्थळप्रती साक्षांकीत करुन अर्जासोबत सोबत जोडत आहेत.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | जोडले आहे/नाही |
|---|---|---|
| १ | संस्था महानगरपालिकेकडे नोंद असलेले कागदपत्रे. | आहे/नाही |
| २ | संस्थेची घटना व उपविधी. | आहे/नाही |
| ३ | सन २०२३-२०२४ असल्यास किंवा लगतच्या वर्षाचा ताळेबंद. | आहे/नाही |
| ४ | संस्थेकडे कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन ) १९७० अन्वये परवाना. | आहे/नाही |
| ५ | संस्थेकडे कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन ) १९७० अन्वये परवाना. | आहे/नाही |
| ६ | कामगार भविष्यनिर्वाह निधी अधिनियम १९४२ अतंर्गत नोंदणी परवाना. | आहे/नाही |
| ७ | कामगार राज्य विमा योजना १९४८ अतंर्गत नोंदणी परवाना. | आहे/नाही |
| ८ | महानगरपालिका रूग्णालयामध्ये साफसफाईच्या रुग्णसेवा अनुभवाची कागदपत्रे | आहे/नाही |
| ९ | संस्थेच्या सर्व पदाधिकाऱयांचे संपूर्ण नाव, पद मोबाईल नंबर यांची सुची. | आहे/नाही |
| १० | संस्थेचे पॅन कार्ड. | आहे/नाही |
| ११ | GST नोंदणी क्रमांक . | आहे/नाही |
| १२ | वास्तव्याचा पुरावा लेटरहेडवर | आहे/नाही |
| १३ | रू.१०० च्या स्टॅप पेपरवर हमी पत्र सोबत दिलेल्या परिशिष्ट-ड नमुन्यात. | आहे/नाही |
| १४ | कागद पत्रांसोबत संस्थेच्या किमान तीन पदाधिकाऱयांचे ज्यात अध्यक्ष, सचिव व अन्य एक पदाधिकारी यांचे स्वतःच्या स्वाक्षरी | आहे/नाही |

| | | |
|---|---|---|
| | सहीत फोटो देणे आवश्यक आहे. | |

मी असे घोषित करतो/ करते की जाहिरातीतील अटी/शर्ती वाचल्या असून अर्जामध्ये नमूद केलेली माहिती व सोबत जोडलेली कागदपत्रे खरी असून, सदर माहिती व कागदपत्रे खोटी आढळून आल्यास माझी संस्था सदर कामासाठी अपात्र ठरेल.

अर्जदार

संस्था अध्यक्ष /सचिव

सही /रबरी शिक्का